# स्त्रियावर अत्याचारः ड्रेसकोडचे कोडे

मंगला सामंत यांचा 'युवा सकाळ' शनिवार दिनांक १४ मे २००५ मधील लेख वाचनात आला. त्या नंतर 'युवा सकाळ' शनिवार दिनांक २१ मे २००५ मधील विविध व्यक्तिंचा पडसादही वाचनात आला. सर्व मजकुरामध्ये स्त्री व पुरुष एकमेकाचे वैरी समजुन 'मी चुकत नाही. मी करतो/करते तेंच कसे बरोबर आहे' ही भावना दिसुन आली. म्हणून हा प्रपंच.

मंगला सामंताना वाटते स्त्रीचा पोषाख आणि अत्याचार यांचा कांहीही संबध नाही. त्या करता त्यानी आदिमानवा पासुन पाश्च्यात्य संस्कृति पर्यंतचा आधार घेतला आहे. वस्त्र हे शरीर रक्षणाकरता आहे. तोच त्याचा मूळ उद्देश. आदिमानवाने शरीर झाकले ते उष्णता, वारा, थंडी यापासुन संरक्षण मिळवण्याकरता. अत्याचार रोखण्याकरता नव्हे. असे असते तर बुरखाधारी स्त्रियावर अत्याचार झालेच नसते. येथपर्यंत सामंताचे म्हणणे पटण्या सारखे आहे. तरीपण पोशाखातील वेळोवेळी झालेले बदल कां झाले हे तपासुन पाहिलेच पाहिजे. आणि त्या पेक्षा महत्त्वाचा मुद्दा आत्याचाराचे मूळ शोधण्याचा आहे.

मंगला कदम यानी अत्याचार रोखण्याकरता स्त्रियानी लढाऊ वृत्ती जोपासुन कराटे शिकुन स्वःसंरक्षण करावे हा मुद्दा थोड्याच दिवसापूर्वी दैनिक सकाळ मध्ये मांडला. त्या अगोदर कांही आठवड्या पुर्वी एका लेखिकेने मुला-मुलीना १६ व्या वर्षा पासुन शरीर संबंधा बाबत स्वातंत्र्य असावे असा मुद्दा मांडला. हे सर्व मुद्दे हत्तीची माहिति त्याच्या पायावरुन अथवा कानावरुन किंवा एखाद्या दुसऱ्या एखाद्या व एकाच अवयवावरून करुन घेण्या सारखी आहे. एकत्रपणे सर्व अवयव समजुन घेऊन त्यांचा एकत्रित पणे विचार करणारी नाही.

आपल्या पैकी अनेक तरुण-तरुणीना जास्त करुन तरुणाना पाश्च्यात संसकृतीची त्यातल्या त्यात अमेरिकन स्त्री-पुरुष संबंधातील स्वातंत्र्याची लग्ना पुर्वी भुरळ पडते. बहुतेकांना या संस्कृतीचे पूर्ण ज्ञान नसते. जेम्स बॉन्ड जसा विश्वातील सर्व स्त्रियाना आपली खाजगी मालमत्ता समजतो व त्या स्त्रियामध्ये ही त्याला खुष करण्या करता चढाओढ असते हेच खरे वाटते. पण, ही स्थिति 'घी देखा मगर बडगा नही देखा' याच प्रकारात मोडते. २-३ वर्षापुर्वी 'साप्ताहिक सकाळ' मध्ये एक कादंबरी प्रकाशित झाली. त्या मध्ये नायिकेला घरी परतण्यास उशीर झाल्याचा एक प्रसंग आहे. एक मध्यम वयीन पुरुष तिला रात्री राहण्याकरता त्याच्या घरी सोय करण्याची तयारी दाखवतो. शेवटी तिला त्याचे सोबत शय्या सोबत करावी लागते. आणि हा बलात्कार नसतो. हे आपण खपवुन घेऊ शकतो काय? परंतु आपल्याला दुसऱ्याच्या संस्कृतीची ओढ वाटावीच का? अमेरिकन संस्कृति जेमतेम ४०० वर्षाची. आपली कमीतकमी ५००० वर्षांची. आपण पुष्कळ चढ उतार अनुभवले आहेत. एक काळ असा होता की खलनायक सुद्धा बलात्त्कार म्हणजे पाप समजत असे. दुर्योधनाला द्रोपदीवर बलात्त्कार करणे सहज साध्य होते. रावणालाही सीते बाबतीत तसे करता आले असते. परंतु दोघानीही तसे केले नाही. त्याचे कारण आपली संस्कृती. बहुतेक सर्व सामाजिक समस्या वर आपल्या संस्कृतीतुनच उत्तरे मिळु शकतात.

जगामध्ये प्राण्याना सर्वात प्रिय गोष्ट कोठली याचे उत्तर सर्वाकडुन प्राण हेच येईल. प्राण वाचववयाचे तर शत्रुशी लढण्याकरता ताकद गरजेची आहे. समुह हा ताकद संपादनाचा उत्तम मार्ग. समुह म्हणजे कुटुंब, नातेवाईक, मित्र मैत्रिणी, गल्ली, गांव, समाज या प्रकारे देश, धर्म, जग, विश्व असा कोठलाही असु शकतो. मोठा समुह म्हणजे मोठी शक्ति. केवळ या कारणास्तव आपण समुहात-समाजात राहतो. समाजात राहवयाचे म्हणजे प्रत्येकाने कांही पथ्थे पाळणे आवश्यक आहे. समाज एकसंध ठेवण्याकरता ही किंमत प्रत्येकाला देणे अनिवार्य आहे. ही किंमत म्हणजे समाजाचे कायदे कानुन पाळणे.

नीतिनियमानुसार समाज चालतो. नीति शाश्वत आहे. नियमाना स्थल, काल व समाज यांचे बंधन असते. नीति षडःरिपुवर मात केली पाहिजे असे सांगते. त्याकरता नियम बनविले जातात. प्रत्येक प्राण्याला खूप गोष्टीचा मोह असतो. त्या मध्ये मालकी हक्क, जिज्ञासा व लालसा हे प्रमुख घटक आहेत. स्त्रीला पुरुषावर व पुरुषाला स्त्रीवर हक्क गाजवावासा वाटतो. कोठल्याही स्त्रीला तिच्या नवऱ्याचे दुसऱ्या स्त्रीवर शाररिक संबंध सहन होत नाहीत. तसेच

पुरुषालाही. स्त्रीला पुरुष म्हणजे काय ही जाणण्याची लालसा असते व तसेंच पुरुषालाही. लालसे बाबतही तोच नियम आहे. समाजामध्ये ज्या कांही बऱ्या वाईट गोष्टी घडतात त्याचे मूळ या घटकावर अवलंबुन आहे. इतरही घटक कारणिभुत आहेत परंतु, प्रमुख घटक हेंच.

आदि कालाच्या सुरवातीला पशु व मानव या मध्ये स्त्री-पुरुष संबंधात फरक नसावा. स्त्री-पुरुष संबंधावर कोठलीही बंदी नसावी. या अनिर्बंध संमंधातुन प्रश्न निर्माण झालेच असतील. त्यातुनच समाजा मध्ये भांडणे व्हावयास सुरवात झाली असावी. म्हणुनच नियम बनवण्याची गरज भासली असावी. 'मालकी हक्क' ही कल्पना त्यातुनच निर्माण झा ली असावी. परक्याच्या घरातील वस्तुना आपण हात लावत नाही. त्याला चोरी समजले जाते. याच विचाराने स्त्री-पुरुषा ला एकमेकावर मालकी हक्क देऊन त्या काळी ही प्रश्न सोडवला असावा. यातुनच लग्न या संस्थेचा जन्म झाला असावा. मालकी हक्क आला की त्या बरोबरच संरक्षणाची जबाबदारी पण आपोआपच येते. दुसऱ्या पासुन लपवुन ठेवणे हाही संरक्षणाचा उपाय असतो. असा एक काळ होता की, त्या काळी ग्रीक लोक एक विशिष्ठ प्रकारचा पट्टा स्त्रीयाना वापरावयास लावीत. ही भावना फक्त पुरुषातच असते असे समजण्याचे कारण नाही. पुरुषाचे दंड पिळदार असतील तर स्त्री त्याला अंगरखा घातल्या शिवाय बाल्कनीत उभा सुद्धा राहु देत नाही. कपडे वापरताना हा मुद्दा विचारात घेणे आवश्यक आहे.

हा ही उपाय कांही दिवसानी निषःप्रभ झला असावा. म्हणुनच त्यानी नाती गोती ही कल्पना विकसित केली असावी. व्यक्तिशः मला तर असेच वाटते. आई-मुलगा, वडील-मुलगी, बहिण-भाऊ या मध्ये शरिर संबंध निषिद्ध मानला. आणखी पुढचा विचार करुन स्त्रीला देवीचे स्थान दिले. तुम्हाला आनंद पाहिजे तर तुमच्या मध्ये देवाला राहण्यास प्रसन्नता वाटेल असे वातावरण निर्माण करा. 'यत्र नार्यस्तुः पुज्यन्त्ये तत्र रमन्ते देवतः' हे घोष वाक्य याचेच प्रतिक. गुरुबंधु, गुरुभगिनी ही नाती सुद्धा याच भावनेतुन निर्माण झाली. अत्याचार रोखण्या करता वेळोवेळी अनेक उपाय मानवाच्या उत्पत्ती पासुन करुन पाहिले आहेत. परंतु नियम शाश्वत नाहीत. नीति हाच शाश्वत उपाय होऊ शकतो. आपल्या पुर्वजानी नियमा बरोबर किंबहुना नीतिला जास्तच प्राधान्य दिले. हाच एकमेव उपाय आहे.

कोणे एके काळी एका तरुणा मध्ये तरुणीचे घोटे कसे असतात हे पाहण्याची जिज्ञासा उत्त्पन्न झाली. त्याला एक तरुणी रस्त्या वरुन जाताना दिसली. त्याने तिला तशी विनंती केली. त्या बद्दल पैसेही देण्याची तयारी दाखवली. तिने आईला विचारुन सांगते असे त्याला कबूल केले. आईने त्याला विरोध दाखवला नाही. नंतर कांही दिवसानी पोटरी पाहण्याची जिज्ञासा त्याला स्वस्थ बसु देईना. त्यालाही आईने परवानगी दिली. मग ज्या वेळी त्याने गुढघे दाखवण्या बद्दल विचारले तेंव्हा आईला न विचारताच तिने गुढगे दाखविले. ही जिज्ञासा वाढत गेली व शेवटी त्या तरुणीने आपले शील गमावले. ही गोष्ट जर पाश्चात जगतात सांगितली तर 'शीलभ्रष्ट झाली' हे कोणीही मान्य करणार नाही. त्यांच्या शब्दकोषा मध्ये 'शीलभ्रष्ट' हा शब्दच नाही. गुंगीचे औषध पाजुन स्त्रीला आपल्या घरी नेऊन शरीर संबंध केला तर ती स्त्री बलात्कार झाला असे समजत नाही. कांही तास घरात राहण्यास दिले व पुरुषाने शरीर भोग घेतला त्याला तेथे बलात्कार समजतच नाहीत. तरुण-तरुणीने, अगदी अनोळखी सुद्धा, कांही क्षण एकत्र येऊन शरीर सुख घेतले तर त्याला तेथील समाज बलात्कार समजत नाही. अगदी बलात्कार होत असला तरी तेथील तरुणी 'यातुन सुटका नाही तर आनंद का घेऊ नये?' असाच विचार करतात. या गोष्टी स्वीकारण्याची भारतीय समाजाची तयारी आहे काय? हे स्वीकारण्याची तयारी असेल तर 'पाश्चात्य जगतात तंग व तोकडे कपडे मुली वापरतात तरी तेथें बलात्कार होत नाहीत' हे मान्य करता येईल.

जगभरात समाजधुरीणानी स्त्री वरील लैंगिक अत्याचार रोखण्याकरता अनेक प्रयोग केले. कपडे घातले. बुरखा घातला, अगदी कुलपेही ठोकली. कांही काळ त्याला यश मिळाले. पण हे यश शाश्वत नव्हते. एका ग्रीक सैनिकाने लढाईला जाताना त्याच्या पत्निच्या पट्ट्याची किल्ली मित्राला दिली व सांगितले की मी लढाईवरुन परत आलो नाही तर तू या किल्लीचा वापर कर. तो सैनिक पहिल्या मुक्कामाला पोहचण्या पूर्वीच त्याचा मित्र धावत आला व ती किल्ली लागत नाही हे सांगु लागला.

विचारान्ति आपल्या पुढे दोन पर्याय दिसतात. पहिला, आपणही आपले नीतिशास्त्र सोडुन देऊन पावसाचे पाणि जसे वाहेल तसे वाहु देणे. बंधारे घालु नका, पाट काढु नका, जे होईल तसे होऊ द्या. आणि दुसरा, आपल्या पूर्वजानी अनुभवातुन शोधलेला 'मनावर ताबा' हाच रामबाण उपाय समजुन त्यावर अम्मल करणे.

शिवाजी महाराजाना आबाजी सोनदेव यानी कल्याणच्या सुभेदाराची अति सुंदर तरुण सून भेट देण्या करता दरबारात आणली. भारतात राजाला देव मानतात. राजाने कांहीही केले तर त्या बद्दल प्रजा कधीही विरोध करत नाही. महाराज आपली लालसा तृप्त करु शकले असते व त्या बद्दल त्याना कोणीही दोष दिला नसता. असे असुन सुद्धा महाराजानी  आबाजीना बक्षीस देण्या ऐवजी समज दिली. हे असे का झाले? त्याला कारण भारतीय नीतिशास्त्र व जिजामातेचे प्रशिक्षण. स्त्री वरील अत्याचार थांबवण्याचा हाच शाश्वत उपाय. या मुळेच सीता, द्रोपदीवर खलनायकानी सुद्धा बलात्कार केला नाही. थोड्या दिवसापूर्वी 'मुंबई मध्ये एका पोलीसाने एका मुलीवर तिच्या दोन मित्रांच्या उपस्थितित चौकीवर नेऊन बलात्कार केला'. या बातमीने संपूर्ण समाज हादरला. पोलीसच अत्याचार करु लागले तर कोणाचा आधार राहिला. ही पोलिसाने अत्याचार करण्याची पहिलीच वेळ नव्हती. फक्त ज्या समाजाच्या ज्या थरातुन ती मुलगी आली तो थर  या अगोदर अत्याचार झालेल्या स्त्रीया पेक्षा वेगळा आहे. जर तिचे मित्र शुद्ध भावनेने तिच्या बरोबर असतील तर ते नक्कीच त्या मुलीला वाचवू शकले असते. तेथें उपस्थित लोकानी त्याना मदत नक्कीच केली असती. परंतु असे घडले नाही. कारण, सर्वांच्या मनात चांदणे. हे थांबण्या करता छत्रपति शिवाजी महाराज तसेंच राजमाता जिजाऊ आईची मानसिकता समाजामध्ये निर्माण केली पाहिजे. बालपणा पासुन मुलामुलीना घडवले पाहिजे. स्त्रीयानी जिजाऊ  होऊन शिवाजी घडवले पाहिजेत.

अर्थात कितीही प्रयत्न केले तरी कांही काळी मेंढरे कळपात असणारच. बलात्त्कारा सारखे गुन्हे कमी होतील, बंद होणार नाहीत. त्या करता महाभयंकर शिक्षेची तरतुदही असलीच पाहिजे. शिक्षा स्त्रीयाना पण पाहिजे. नाहीतर खोटे आळ घेण्याचा प्रमाद घडु शकतो. मरे पर्यंत फाशी ही शिक्षा तोकडी पडेल. 'क्षण एक पुरे सौख्याचा' असा विचार करणारे गुन्हेगार असु शकतील. म्हणुन त्याना हे सौख्य जीवनाच्या पुढील कालावधीत घेता येऊ नये हीच शिक्षा योग्य. बलात्त्कारी पुरुषाला व खोटे आळ घेणाऱ्या स्त्रीला 'लिंग बदल' हीच शिक्षा योग्य असावी. निदान पुरुषाची 'चांदनी मावशी' व स्त्रीची 'शुर्पणखा' करावी.

तंग व तोकड्या कपड्यांचा अत्याचाराशी फारसा संबंध नसेल. परंतु आपण जी मुल्ये जपतो त्यांचा निश्चितच संबंध आहे. कपड्यांचा संबंध एवढाच की तो सर्वसाधारणपणे एकसारखा असावा. एकसारखा म्हणजे गणवेष नव्हे. जिज्ञासा उत्पन्न होऊ नये असा. थोडक्यात चार चौघी सारखा. मग तो कितीही तंग असो किंवा तोकडा त्याला फारसे महत्त्व नाही. पती-पत्निने आपली शाश्वत मुल्ये त्यांच्या मुलामुली मध्ये रुजवली,  तरच आपण हे अत्याचार रोखु शकु. निरनिराळ्या धर्माच्या सामाजिक संस्थानी राजकारणात लक्ष न घालता समाज प्रबोधन करावे. प्रत्येक गोष्टीचे ग्रंथात समाधन शोधण्या पेक्षा ग्रंथातील नीति समजुन घ्यावी. सद्यः परिस्थिती, आजुबाजुचा समाज, व भौगोलिक स्थान विचारात घेऊन नियम बनवावेत किंवा निदान नियमात परिवर्तन करावेत. उगीच कन्याकुमारी व लेह मध्ये राहणाऱ्याना एकाच प्रकारचे कपडे घालण्याची सक्ती करु नये. त्या करता ज्ञानी व्यक्तिंची आवश्यकता आहे आणि ज्ञानी व्यक्ति स्वार्थी लोकांच्या संस्था पासुन दूर राहणे पसंत करतात. हीच तर ग्यानबाची मेख आहे. त्यामुळेच तर बुरसटलेल्या विचाराच्या लोकांचे फावते. ते जुनेच तुणतुणे वाजवत बसतात. प्रत्येक समस्येचे मूळ ग्रंथात शोधत बसतात व त्याचा त्याना सोईस्कर असा अर्थ लावतात. अशा स्थितित समाज, राष्ट्र व त्यातील प्रत्त्येक व्यक्तिला या जगात सुखासमाधाने राहवयाचे असेल तर प्रत्त्येकानेच हे व्रत घेतले पाहिजे. त्यतल्या त्यात स्त्रीयावर याची जबाबदारी जास्त आहे. या बदला बरोबर अतिभयंकर शिक्षेची तरतुद केली तर 'बलात्त्कार' हा शब्दच आपल्या शब्दकोषातुन हद्दपार होईल.

***